# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

प्रभात | जिल्हा | मंगळवार, दि. ५ फेब्रुवारी २०१९

# राजगुरुनगरमध्ये लोकशाही पंधरवडा

## लोकशाही, निवडणुका व सुशासन विषयावर चर्चासत्र, पथनाट्य

राजगुरुनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - राजगुरुनगर नगरपरिषदेच्या माध्यमातून २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, प्रशासकीय अधिकारी युवराज विरणक यांनी दिली.

जनजागृतीविषयक पथनाट्य, लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयावर चर्चासत्र, जिल्हा परिषद शाळा व विद्यालयात निबंध व वक्तृत्व स्पर्धा, भारतीय संविधानातील ७३ वी ७४ वी घटनादुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने माहिती प्रसिद्ध करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांची निवडणुकीतील वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुली चर्चा, १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक-युवतींची मतदार



राजगुरुनगर : शहर भाजी बाजारात लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने जनजागृती पथनाट्य हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केले.

नोंदणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जनजागृती आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याबरोबरच जनजागृती करणारे फ्लेक्स, बॅनर लावून जनजागृती करण्यात येत आहे. मंगळवारी (दि. ५) भारतीय संविधानातील ७३वी, ७४वी घटनादुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लोकशाही, निवडणुका व सुशासन या विषयावर अद्यलेख माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. ६ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांची निवडणुकीवेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुली चर्चा आयोजित करण्यात आली आहे. दि. ७ रोजी शैक्षणिक संस्थामध्ये महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जाद्वारे १८ वर्षे पूर्ण झालेल्यांबरोबर मतदार यादीत नाव नोंदवून घेणार असा आशयाचे प्रमाणपत्र घेणे, ८ फेब्रुवारी रोजी मुख्याधिकारी यांनी इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे नागरिकांना लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयावर तसेच निवडणुकीमध्ये महिलांचा सहभाग याविषयी चर्चा व आवाहन करणे, दि. ९ रोजी लोकशाही निवडणूक व सुशासन अंतर्गत महिलांचा सहभाग या विषयावर चर्चासत्र व ज्या मतदान केंद्रावर महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे, अशा मतदान केंद्राचा शोध घेऊन त्याठिकाणी महिला मतदारांचे नाव नोंदणी मोहीम राबविणे. दि. १० रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही निवडणूक व सुशासन या उपक्रमात याबाबत येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख